■ अनुक्रमणिका ■

- संस्थेचा परिचय
- कमला महाविद्यालय
- ध्येय आणि उद्दिष्ट्ये
- गुणवत्तेची परंपरा
- संलग्नता
- प्रवेशासंदर्भात मार्गदर्शन व आवश्यक पात्रता
- प्रवेश रद्द करण्याबाबत नियम
- उपस्थितीविषयक नियम
- विद्यार्थी अपघात व सुरक्षा विमा योजना
- शिस्त व वर्तणूकविषयक नियम
- अंतर्गत तक्रार निवारण समिती
- रॅगिंग प्रतिबंधक नियम
- तक्रार निवारण समिती
- विद्यापीठ विविध कल्याणकारी योजना
- आधार कार्ड क्रमांक
- मतदार कार्ड
- प्रवेश मार्गदर्शन समिती
- अध्यापन माध्यम आणि महाविद्यालयाची वेळ
- करिअर ओरिएंटेड कोर्सेस
- अभ्यासक्रमाची लवचिकता
- बॅचलर ऑफ कॉम्प्युटर ॲप्लीकेशन्स (बी.सी.ए.)
- बॅचलर ऑफ व्होकेशन (बी. व्होक.)
- महाविद्यालयीन व विद्यापीठीय परीक्षा
- विद्यापीठीय परीक्षा पात्रता
- फी माफी, शिष्यवृत्ती, पारितोषिके व विद्यार्थिनी कल्याण निधी
- कमला महाविद्यालयाची वैशिष्ट्ये व विद्यार्थिनींना पुरविण्यात येणाऱ्या विविध सुविधा
- यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ
- महाविद्यालयाचे शैक्षणिक वेळापत्रक
- विद्यार्थिनींकडून मूल्यमापन
- कौशल्याधिष्ठित स्वयंसहाय्यता अभ्यासक्रम
- विविध समित्या
- महाविद्यालय विद्यार्थी परिषद
- माजी विद्यार्थिनी संघ
- शिक्षक पालक संघ
- समुपदेशन केंद्र
- सल्ला केंद्र
- करिअर कट्टा
- शैक्षणिक शुल्क (बी. सी. ए., बी. व्होक.) २०२४-२५
- शिवाजी विद्यापीठ मान्यताप्राप्त कोर्सेस प्रमाणपत्र

Vision

Empowerment of women

Mission

- Dissemination of women's education.
- Inculcation of moral values and scientific temper.
- Overall development of personality.

Goals

1. Introduction of Career Oriented Courses.
2. Imparting latest academic knowledge in order to make our students successful to face challenges of life.
3. Promotion and enhancement of students' inborn qualities and literary skills.
4. Organization of self supporting Programmes.
5. Encouragement to the students for active participation in various curricular, co-curricular, extra-curricular and extension activities.
6. Motivation to the students for further studies and to face various competitive examinations.
7. Enrichment of library by adopting latest Technology.
8. Promotion of use of I.C.T.
9. Organization of various extension activities apart from N.S.S. and N.C.C. for enrichment of values.

Quality Policy

We are uncompromisingly committed to provide quality education, compatible with 'Regional to Global standards, exclusively for women to impart academic excellence, employability and leadership with social concern.

ताराराणी विद्यापीठाचे

कमला कॉलेज, कोल्हापूर

१) संस्थेचा परिचय

हिंदवी स्वराज्य संरक्षिका आणि संवर्धिका, युगस्त्री ताराराणीचे निःस्सीम भक्त कोल्हापूरचे राजे स्व. राजाराम महाराज यांच्या प्रेरणेने व ताराराणी विद्यापीठाचे संस्थापक स्व. डॉ. व्ही. टी. पाटील यांच्या त्यागातून व अथक परिश्रमातून 'ताराराणी विद्यापीठ' ही संस्था १९४५ साली स्थापन झाली. फक्त २२ विद्यार्थिनींनीशी सुरू केलेली ही संस्था अल्पकालावधीतच नावारुपाला आली. प्रिन्स शिवाजी विद्यालय (प्राथमिक शाळा), उषाराजे गर्ल्स हायस्कूल, ज्युनिअर कॉलेज ऑफ एज्युकेशन, कमला कॉलेज, कुमार भवन, कडगांव असा संस्थेचा शाखा विस्तार झालेला आहे.

२) कमला महाविद्यालय

स्व. डॉ. व्ही. टी. पाटील व त्यांच्या समानशील पत्नी स्व. सौ. सरोजिनीदेवी यांनी त्याकाळी आपल्या ४० लाखांपेक्षा अधिक किंमतीच्या सर्व मालमत्तेचा ताराराणी विद्यापीठातील विद्यार्थिनींच्या कल्याणासाठी सौ. सरोजिनीदेवी विश्वनाथ ट्रस्ट निर्माण केला. स्व. सौ. सरोजिनीदेवी यांनी संपूर्ण हयातभर ताराराणी विद्यापीठाची काळजी वाहिली. त्यांनी केलेल्या त्यागाच्या स्मृतिप्रीत्यर्थ त्यांचे नाव 'कमला' महाविद्यालयास देण्यात आले. या महाविद्यालयात कला शाखेत ११ वी ते पदवीपर्यंत व गृहशास्त्र, योगशास्त्र व इंग्रजी विषयातील पदव्युत्तर पर्यंतचे तर वाणिज्य शाखेत ११ वी ते पदवीपर्यंत व बी.सी.ए. शिक्षणाची सोय आहे. **जून २०१४ पासून महाविद्यालयात बॅचलर ऑफ व्होकेशन** (B.Voc.) **इन १) रिटेल मॅनेजमेंट ॲन्ड आय. टी. २) फूड प्रोसेसिंग ॲण्ड मॅनेजमेंट हे व्यावसायिक अभ्यासक्रम सुरू करण्यात आले आहेत.** पदव्युत्तर स्तरावर डिप्लोमा इन योग थेरपी शिकविण्याची सोय आहे. तसेच विज्ञान शाखेचे कनिष्ठ महाविद्यालयीन स्तरावरील (इ. ११ वी ते १२ वी) शिक्षण दिले जाते. यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठाचे बी. ए. व बी. कॉम हे पदवी अभ्यासक्रम एम. ए. (मराठी) व एम. ए. (हिंदी) हे पदव्युत्तर अभ्यासक्रम शिकविण्याची सोय आहे. सर्व शाखेत मिळून आज २६५५ विद्यार्थिनी शिक्षण घेत आहेत.

महाविद्यालयाने स्थापनेपासून आजपर्यंत केलेल्या सर्वांगीण प्रगतीची दखल घेऊन विद्यापीठ अनुदान आयोग, नवी दिल्ली यांचेकडून महाविद्यालयास **'कॉलेज वुईथ पोटेन्शियल फॉर एक्सलन्स'** (सी.पी.ई.) हा विशेष दर्जा मिळाला आहे. देशपातळीवर निवडल्या गेलेल्या १२४ महाविद्यालयातून कमला महाविद्यालयाची झालेली ही निवड विशेष उल्लेखनीय आहे.

नॅक, बेंगलोर या संस्थेकडून महाविद्यालयास २०१७ साली 'ए' मानांकन (३.१२ सी.जी.पी.ए.) प्राप्त झाले आहे. शैक्षणिक वर्ष २०२२-२३ पासून यु.जी.सी. नवी दिल्लीद्वारे महाविद्यालयास स्वायत्त दर्जा प्राप्त झाला आहे. हा महाविद्यालयाच्या गौरवशाली परंपरेतील मानाचा तुराच होय. शैक्षणिक वर्ष २०२३-२४ पासून महाविद्यालयात राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० ची प्रभावीपणे अंमलबजावणी करण्यात आलेली आहे.

३) ध्येय आणि उद्दिष्टये

समाजात उपेक्षित असलेल्या स्त्रीला ज्ञानदान करावयाचे कारण 'एक स्त्री शिकली तर कुटुंब शहाणे होते' या ध्येयाने ताराराणी विद्यापीठाची स्थापना करण्यात आली. शैक्षणिक अभ्यासक्रमाबरोबरच विद्यार्थिनींना संपूर्ण शिक्षण देणे व त्यांचा सर्वांगीण विकास करुन त्यांना बौद्धिक, आर्थिक तसेच सामाजिक दृष्टिकोनातून स्वयंपूर्ण बनविणे, स्वआदर व आत्मविश्वास जागृत करुन जीवनाच्या विविध क्षेत्रातील आव्हाने पेलण्यास समर्थ बनविणे हे महाविद्यालयाचे उद्दिष्ट आहे. महाविद्यालयात प्रवेश घेणाऱ्या विद्यार्थिनीने महाराणी ताराराणीचा आदर्श डोळ्यासमोर ठेऊन सत्शील वर्तन ठेवणे, शिस्त व अनुशासन अंगी बाणविणे आवश्यक आहे. स्व. डॉ. व्ही. टी. पाटील तथा काकाजींचे 'प्रति ताराराणी' बनविण्याचे उदात्त स्वप्न साकार करण्यासाठी प्रत्येक विद्यार्थिनीने प्रामाणिक प्रयत्न करणे अपेक्षित आहे.

४) गुणवत्तेची परंपरा

सर्व वर्गांच्या परीक्षांचे नेत्रदीपक निकाल हे आमच्या महाविद्यालयाचे वैशिष्ट्य आहे. सन २०२२-२३ चे उच्च गुणवत्ता सिद्ध करणारे निकाल.

वर्ग	निकाल	विशेष गुणवत्ता	प्रथम श्रेणी
बी.सी.ए.	७०.५२%	११	११
बी.व्होक (रिटेल मॅनेजमेंट ॲन्ड आय.टी.)	१००%	४	३
बी.व्होक (फूड प्रोसेसिंग ॲन्ड मॅनेजमेंट)	१००%	७	१

*** बी. व्होक (रिटेल मॅनेजमेंट ॲन्ड आय. टी. प्रथम वर्ष) हा अभ्यासक्रम शैक्षणिक वर्ष २०२४-२५ पासून बंद करण्यात आला आहे.**

५) संलग्नता

महाविद्यालयास अल्पावधीतच शिवाजी विद्यापीठ व महाराष्ट्र शासनाकडून 'कायमस्वरुपी संलग्नता' मिळाली. महाविद्यालयास १९८७ साली विद्यापीठ अनुदान आयोगाच्या 2F व १९९२ साली 12-B या कलमाखाली मान्यता मिळाली आहे.

६) प्रवेशासंदर्भात मार्गदर्शन व आवश्यक पात्रता

पात्रता - शासन निर्णय कलम क (३) मधील कला, विज्ञान व वाणिज्य अभ्यासक्रम यामध्ये प्रवेश पात्रता महाराष्ट्र राज्य उच्च माध्यमिक शालांत प्रमाणपत्र परीक्षा मंडळाची (इयत्ता १२ वी) उत्तीर्ण किंवा शासनमान्य समकक्ष मंडळाची परीक्षा उत्तीर्ण.

१. विद्यापीठाच्या नियमानुसार व उपलब्ध जागेनुसार गुणवत्तेप्रमाणे बी. ए. भाग १ व बी. कॉम भाग १ या वर्गांना प्रवेश दिले जातील. उपलब्ध जागेपैकी ८०% जागा महाविद्यालयाशी संलग्न कनिष्ठ महाविद्यालयातील विद्यार्थिनींसाठी राखीव राहतील व उरलेल्या २०% जागा इतर कनिष्ठ

महाविद्यालयातील विद्यार्थिनींसाठी खुल्या राहतील व त्या जागा विद्यापीठाच्या नियमानुसार भरल्या जातील. तसेच शिवाजी विद्यापीठ व शासन निर्णयानुसार आरक्षण लागू राहील. तसेच माजी सैनिकांच्या पाल्यांसाठी १०% प्रवेश राखीव ठेवण्यात येतील. तसेच व्यवस्थापनासाठी १५% जागा अभ्यासक्रमनिहाय ठेवण्यात येतील.

बी.सी.ए आणि बी. व्होक. या अभ्यासक्रमासाठी प्रवेश क्षमता पुढीलप्रमाणे

B.C.A. I - 80	B. Voc. I - 50
B.C.A. II - 80	B. Voc. II - 50
B.C.A. III - 80	B. Voc. III - 50

शैक्षणिक वर्ष २०२४-२५ पासून B.C.A. हा अभ्यासक्रम AICTE मान्यताप्राप्त झाल्याने AICTE चे प्रवेशाबाबतचे सर्व नियम B.C.A. प्रथम वर्षांसाठी बंधनकारक राहतील.

२. बी. सी. ए. भाग १ व बी. व्होक. भाग १

यामध्ये प्रवेश घेतेवेळी बारावीचे गुणपत्रक अथवा तत्सम समकक्ष परीक्षेचे गुणपत्रक जोडणे आवश्यक.

३. पात्रता प्रमाणपत्र (Eligbility Certificate)

बी.सी.ए. भाग १/ बी.व्होक. भाग १ च्या वर्गात प्रवेश घेणाऱ्या विद्यार्थिनींनी विद्यापीठाकडून पात्रता प्रमाणपत्र मिळविण्यासाठी छापील फॉर्म भरुन सोबत रु. ७५/- फी भरावी. महाराष्ट्राबाहेरील अथवा डी. एड्. परीक्षा उत्तीर्ण असणाऱ्या विद्यार्थिनीस सदरची फी रु. ३००/ राहील व ती प्रवेश घेतेवेळी भरावी लागेल.

४. स्थलांतर प्रमाणपत्र (Migration Certificate)

अन्य विद्यापीठातून येणाऱ्या विद्यार्थिनीस प्रवेश घेतेवेळी पूर्वीच्या महाविद्यालयातील प्राचार्यांचा ना हरकत दाखला व स्थलांतर प्रमाणपत्र जोडणे आवश्यक आहे. प्रवेश घेतेवेळी स्थलांतर दाखल्यासोबत आवश्यक ती फी भरणे गरजेचे आहे.

५. प्रवेश अर्जासोबत जोडावयाची आवश्यक कागदपत्रे पुढीलप्रमाणे

१) उच्च माध्यमिक (बारावी) अथवा तत्सम समकक्ष परीक्षा गुणपत्रिका मूळप्रत व तिच्या दोन सत्य प्रती.

२) शाळा सोडल्याचा मूळ दाखला व त्याच्या दोन सत्य प्रती.

७) प्रवेश रद्द करण्याबाबत नियम

विद्यार्थिनीस प्रवेश रद्द करावयाचा असल्यास

१) कॉशन मनी, लायब्ररी डिपॉझिट, लॅबोरेटरी डिपॉझिट काही अटींवर परत करण्यात येतील.

२) फक्त ट्युशन फी खालील अटींवर परत करण्यात येते.

अ) जर विद्यार्थिनीने शैक्षणिक सत्र सुरु होण्यापूर्वी प्रवेश रद्द केला असल्यास, ट्युशन फीच्या २५%, रक्कम प्रशासकीय शुल्क म्हणून कमी करण्यात येईल.

ब) महाविद्यालयाने निर्धारित केलेल्या प्रवेश प्रक्रियेच्या शेवटच्या दिवसापूर्वी विद्यार्थिनीने प्रवेश रद्द करण्याबाबत अर्ज केल्यास ५०% रक्कम कपात करण्यात येईल.

क) प्रवेश प्रक्रियेच्या शेवटच्या दिवसानंतर ट्युशन फी परताव्याची मागणी करता येणार नाही.

ड) दुसरीकडे प्रवेश मिळाल्यानंतर विद्यार्थिनीने महाविद्यालयातील प्रवेश बदलल्याबाबत अथवा महाविद्यालय सोडल्याबाबत कळवले नसल्यास पूर्ण सत्राची अथवा वर्षाची फी आकारण्यात येईल.

८) उपस्थितीविषयक नियम

१) विद्यार्थिनीने वर्षातील किमान ८०% तासांना उपस्थित असणे आवश्यक आहे.

२) शासन परिपत्रक क्रमांक टी. ई. एन. ३३९६/७४९८ तां शि. १ दि. १७ जुलै १९९६ नुसार विद्यार्थिनींची उपस्थिती परीक्षेसाठी पात्र अथवा अपात्र ठरविण्यात येते.

३) ज्या विद्यार्थिनी आपल्या उपस्थितीची किमान टक्केवारी पूर्ण करणार नाहीत त्यांना परीक्षेस बसण्यास अपात्र ठरविण्यात येईल व त्यांच्या संभाव्य नुकसानीची जबाबदारी त्यांचे स्वत:वर राहील.

९) विद्यार्थी अपघात सुरक्षा विमा योजना

शिवाजी विद्यापीठाअंतर्गत शिक्षण घेणाऱ्या सर्व विद्यार्थ्यांसाठी अपघात व सुरक्षा विमा योजना सुरु करण्यात आली आहे. उपरोक्त विमा योजनेसाठी विद्यार्थिनीकडून रु. १००/- प्रतिवर्षी इतका विमा हप्ता जमा करून घेण्यात येतो.

जर.....

१) घरातून महाविद्यालयाकडे आणि परत महाविद्यालयाकडून घराकडे अशा कोणत्याही तऱ्हेने येताना/जाताना विद्यार्थिनीचा अपघात झाल्यास,

२) मान्यताप्राप्त शैक्षणिक सहली किंवा कॉलेजने पुरस्कृत केलेल्या कोणत्याही शैक्षणिक किंवा कार्यालयीन कामासाठी जाताना/येताना अपघात झाल्यास,

३) विद्यार्थिनीस महाविद्यालयाच्या आवारात अपघात झाल्यास ही विमा जोखीम राहील.

१०) शिस्त व वर्तणूकविषयक नियम

१) शिस्त हे महाविद्यालयाचे खास वैशिष्ट्य आहे - विद्यार्थिनींचा अभ्यास, उपस्थिती व त्यांचे महाविद्यालयातील व बाहेरील वर्तन याबाबतीत महाविद्यालयाने तयार केलेले सर्व नियम विद्यार्थिनींना बंधनकारक राहतील.

२) महाविद्यालयातील व्याख्यानांचे तास, प्रात्यक्षिके, शैक्षणिक उपक्रम, शारीरिक शिक्षणाचे तास व सर्व परीक्षांना नियमित हजर असणे हा महाविद्यालयाच्या शिस्तीचा भाग आहे.

३) विद्यार्थिनींना महाविद्यालयामध्ये उपस्थित असताना व महाविद्यालयाच्या वतीने संपन्न होणाऱ्या सर्व कार्यक्रमाचे वेळी स्वत:चे ओळखपत्र गळ्यात घालणे बंधनकारक आहे.

४) शासनाच्या आदेशानुसार प्रत्येक विद्यार्थिनीकडे आधार क्रमांक असणे अनिवार्य आहे. जर आधारकार्ड अद्ययावत नसेल तर कोणत्याही योजनांचा लाभ मिळणार नाही.

५) वर्ग सुरु असताना व्हरांड्यात किंवा महाविद्यालयाच्या आवारात रेंगाळता कामा नये व इतर वर्गांना आपल्या वर्तनाने त्रास होणार नाही याची दक्षता घेणे आवश्यक आहे.

६) विद्यार्थिनींव्यतिरिक्त कोणत्याही व्यक्तिस परवानगीशिवाय महाविद्यालयाच्या आवारात अगर इमारतीत परस्पर प्रवेश करता येणार नाही. (याची माहिती प्रत्येक विद्यार्थिनीने पालकांना देणे आवश्यक आहे.)

७) महाविद्यालयाच्या मालमत्तेची (उदा. भिंती, दरवाजे, काचा, फळा, डेस्क, संगणक, प्रयोगशाळेतील साहित्य इ.) प्रत्येकीने काळजी घ्यावी. मोडतोड क्षम्य ठरणार नाही.

८) सर्व विद्यार्थिनींनी महाविद्यालयामध्ये नियमित व वेळेवर उपस्थित रहावे.

९) महाविद्यालयाच्या आवारातील स्मारके व त्यालगत असलेल्या चौथऱ्यावर, व्हरांड्यात आणि वाहन तळावर लावलेल्या वाहनांवर बसू नये.

१०) विद्यार्थिनींच्या पोशाखासंदर्भात महाविद्यालयाची कोणतीही अट नाही. पण महाविद्यालयाच्या लौकिकास बाधा येणार नाही असा पोशाख व वर्तणूक विद्यार्थिनींची असावी.

११) विद्यार्थिनींच्या कोणत्याही अडचणी असल्यास (वैयक्तिक व शैक्षणिक) त्यांनी त्या संबंधित वर्गशिक्षक, मा. प्राचार्य यांच्या निदर्शनास आणून द्याव्यात.

१२) सहल अथवा इतर शैक्षणिक उपक्रम आयोजित करीत असताना विद्यार्थिनींना मा. प्राचार्यांची पूर्व परवानगी घेणे आवश्यक आहे.

१३) संस्थेच्या परिपत्रकानुसार विद्यार्थिनी संस्थेच्या आवारात मोबाईलच्या गैरवापरास बंदी घालण्यात आलेली आहे. जर मोबाईलचा गैरवापर करताना आढळल्यास मोबाईल जप्त करुन रु. ५००/- दंड आकारण्यात येईल. वरील कोणत्याही गैरवर्तनाबद्दल मा. प्राचार्यांचा निर्णय अंतिम राहील.

११) अंतर्गत तक्रार निवारण समिती

कामाच्या ठिकाणी महिलांचा लैंगिक छळ संरक्षण (प्रतिबंध, मनाई आणि निवारण) अधिनियम २०१३ या कायद्यानुसार महाविद्यालयांतर्गत तक्रार निवारण समिती कार्यरत आहे. विद्यार्थिनींमध्ये लैंगिक छळ प्रतिबंधक जाणीव जागृती निर्माण करणे आणि अशा प्रकारच्या तक्रारींचे निराकरण करणे ह्या करिता सदर समिती सक्रिय आहे.

१२) विद्यार्थी तक्रार निवारण कक्ष

महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ एकरूप परिनियम २०१९ नुसार महाविद्यालयात विद्यार्थी तक्रार निवारण कक्ष स्थापन करणेत आला आहे. या कक्षामार्फत विद्यार्थिनींच्या तक्रारींचे निवारण केले जाते. या संदर्भातील नियम विद्यार्थिनींच्या मागणीनुसार कार्यालयातून उपलब्ध करून दिले जातील.

१३) रॅगिंग प्रतिबंधक नियम

सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयानुसार व यु.जी.सी. च्या मार्गदर्शक सूचनेनुसार तसेच महाराष्ट्र शासनाच्या आदेशानुसार 'रॅगिंग' हा दखलपात्र गुन्हा आहे. महाराष्ट्र शासन रॅगिंग प्रतिबंधक नियम १९९१ नुसार. रॅगिंग करणाऱ्या विद्यार्थिनींवर कडक कायदेशीर कारवाई करण्यात येईल. अशा प्रत्येक घटनेबाबत अत्यंत कडक रितीने नियमांची अंमलबजावणी महाविद्यालयाकडून केली जाईल. त्याकरिता महाविद्यालयात ॲण्टी रॅगिंग सेल, ॲण्टी रॅगिंग स्क्वॉड, मोनिटरींग सेल व मेंटोरिंग सेलची स्थापना करण्यात आली आहे. शासनाच्या नियमाप्रमाणे नोडल ऑफिसरची नियुक्ती केली आहे. तसेच प्रत्येक विद्यार्थी व पालकास त्यासंदर्भात शपथपत्रे भरुन देणे अनिवार्य आहे. सदरचे शपथपत्र www. antiragging.in या संकेत स्थळावर ऑनलाईन भरून त्याची प्रिंटआऊट कार्यालयात सादर करावी. रॅगिंग प्रतिबंधक कायदा माहितीपत्रकात स्वतंत्र पानावर दिलेला आहे.

१४) तक्रार निवारण समिती

विद्यार्थिनींच्या वैयक्तिक अथवा इतर समस्यांचे निराकरण करण्याकरिता तक्रार निवारण समितीची स्थापना महाविद्यालयात करण्यात आली आहे. तरी त्या संबंधी विद्यार्थिनींनी व पालकांनी समस्यांचे निराकरण करण्याकरिता समिती सदस्यांना भेटावे. आपण सांगितलेली सर्व माहिती गोपनीय ठेवण्यात येईल. तसेच वरील अडचणीसंदर्भात महाविद्यालयात सूचना पेटी ठेवण्यात आली असून विद्यार्थिनींच्या उपयुक्त सूचना विचारात घेतल्या जातील.

१५) विद्यापीठ विविध कल्याणकारी योजना

शिवाजी विद्यापीठाच्या विद्यार्थिनींकरिता असलेल्या विविध कल्याणकारी योजनांचा लाभ घेण्याकरिता सविस्तर माहितीसाठी विद्यापीठाचे संकेतस्थळावरील www.unishivaji.ac.in → STUDENTS → Students Welfare → Department of Students Welfare या पानावरील माहिती पाहता येईल.

१६) आधार कार्ड क्रमांक

शासनाच्या आदेशानुसार प्रत्येक विद्यार्थिनीकडे आधार कार्ड क्रमांक असणे अनिवार्य आहे.

१७) मतदार कार्ड

१८ वर्षावरील सर्व विद्यार्थिनींकडे मतदार कार्ड असणे अनिवार्य आहे. ज्यांचे मतदार कार्ड नसेल त्यांनी कार्यालयातून मतदार कार्ड नोंदणीसाठी आवश्यक फॉर्म घेऊन त्यामधील माहितीची पूर्तता करून त्वरीत तो कार्यालयात जमा करावा.

१८) प्रवेश मार्गदर्शन समिती

प्रवेशासंबंधी अडचणींचे निराकरण करण्याकरिता प्रवेश मार्गदर्शन समितीची स्थापना महाविद्यालयात करण्यात आली आहे. तरी प्रवेशासंबंधी मार्गदर्शनासाठी सदर समितीकडे संपर्क साधावा.

१९) अध्यापन माध्यम आणि महाविद्यालयाची वेळ

अ.नं.	शाखा/विषय	अध्यापनाचे माध्यम	महाविद्यालयाची वेळ
१.	बी.सी.ए.	इंग्रजी	सकाळी ७.३० ते १२.३०
२.	बी.व्होक.	मराठी व इंग्रजी	सकाळी ७.३० ते १२.३०
	रविवार साप्ताहिक सुट्टी राहील.		

२०) करिअर ओरिएंटेड कोर्सेस

महिला-सबलीकरण (Empowerment of Women) हे ध्येयविधान (Vision) असणाऱ्या कमला महाविद्यालयात पदवी अभ्यासक्रम पूर्ण करत असताना विद्यार्थिनींना व्यावसायिक शिक्षण मिळावे व त्यांना आर्थिकदृष्ट्या स्वयंपूर्ण होता यावे ह्या उद्देशाने महाविद्यालयाने विविध कोर्सेस सुरु केलेले आहेत. विद्यार्थिनींची कोर्सेससाठी असणारी पसंती, व्यावसायिक शिक्षणाची गरज, रोजगाराची उपलब्धता इ. घटक लक्षात घेऊनच सर्व कोर्सेस सुरु करण्यात आलेले आहेत. सदर कोर्सेस शिवाजी विद्यापीठ मान्यताप्राप्त असून त्यास विद्यापीठ अनुदान आयोगाचे (UGC) अर्थसहाय्य मिळालेले आहे. म्हणूनच अत्यल्प फीमध्ये व्यावसायिक शिक्षण घेण्याची अमूल्य संधी विद्यार्थिनींसाठी महाविद्यालयाने दिलेली आहे. आज अनेक विद्यार्थिनी सदर कोर्सेस पूर्ण करून विविध क्षेत्रात कार्यरत असून आर्थिकदृष्ट्या स्वयंपूर्ण बनलेल्या आहेत. सदर कोर्सेस खालीलप्रमाणे

	कोर्सचे नाव	फी रू.	समन्वयक
१.	योगा एज्युकेशनल ॲण्ड हेल्थ	५००/-	डॉ. सुनिता काळे
२.	डाएटेटिक्स ॲण्ड हेल्थ एज्युकेशन	५००/-	प्रा. अश्विनी कुंभार
३.	हॉस्पिटल ॲडमिनिस्ट्रेशन ॲण्ड मॅनेजमेंट	५००/-	डॉ. सागर वाळवेकर
४.	बेसिक कॉम्प्युटर ॲण्ड इन्फर्मेशन टेक्नॉलॉजी	५००/-	डॉ. वर्षा मैंदर्गी
५.	ब्युटीकल्चर ॲण्ड थेरपी	१,५००/-	प्रा. वर्षा साठे
६.	कम्युनिकेशन स्किल्स इन इंग्लिश	१,०००/-	डॉ. नीता धुमाळ
७.	कॉम्प्युटराईज्ड अकौंटिंग	५००/-	डॉ. वर्षा मैंदर्गी

डिप्लोमा इन ब्युटी कल्चर ॲण्ड थेरपी

सौंदर्य हा नुसता शब्द नसून त्याला खूप गहिरा अर्थ आहे. अतिशय चित्तवेधक व्यक्तीमत्व ही जीवनात पुढे जाण्यासाठी आवश्यक अशी गोष्ट झाली आहे. हा एक उद्योजकता निर्माण करणारा, करिअर व कौशल्यावर आधारित कोर्स आहे. थिअरी व प्रात्यक्षिकांमुळे, उत्तम ज्ञान व कौशल्य आधारित ब्युटी कल्चर व थेरपी शिकल्यामुळे विद्यार्थी उत्तम त-हेने स्वतःचे ब्युटी पार्लर चालवू शकतात. हा कोर्स केल्यानंतर सौंदर्य शास्त्राचे उत्तम ज्ञान, मेकअप टेक्निक, त्वचा व केसांचे उपचार, ट्रीटमेंट व सौंदर्यीकरण उत्तम त-हेने करता येते. प्रगत मशिनरीचा वापर करून सौंदर्य निर्माण करण्यामुळे ब्युटी इंडस्ट्रीत स्थिरावण्याचा आत्मविश्वास मिळतो. आजचा काळ हा ब्युटी इंडस्ट्रीचा भरभराटीचा काळ आहे. ब्युटी ट्रीटमेंट ही स्त्रिया व पुरुषांसाठी वेगवेगळी गरज राहिली नाही, तर सर्वांसाठी आवश्यक बाब बनली आहे.

कोर्सकरिता पात्रता - १२ वी पास (कोणत्याही शाखेतून)

कोर्स कालावधी - १ वर्ष (आठवड्यातून ३ दिवस)

कोर्सची फी - ५०००/- रु.

३०००/- रु. (कमला कॉलेज विद्यार्थिनींकरिता)

कोर्समुळे करिअर संधी

- ▶ स्वतःचे ब्युटी पार्लर/शॉप
- ▶ हेल्थ क्लबमध्ये ब्युटीशियन
- ▶ स्पा सेंटरमध्ये रोजगार संधी
- ▶ शैक्षणिक संस्थेत ब्युटी ट्रेनर किंवा पर्सनॅलिटी ग्रुमर
- ▶ ब्युटी प्रॉडक्ट बनविणे (उद्योजकता)

कोर्सचे पेपर

१) पेपर १ - ब्युटी ट्रिटमेंट व टेक्निक - १०० मार्क

२) पेपर २ - ॲनॉटॉमी व ब्युटी कल्चर - १०० मार्क

३) पेपर ३ - बेसिक प्रॅक्टिकल इन ब्युटी ट्रिटमेंट - १०० मार्क

४) पेपर ४ - ॲडव्हान्स प्रॅक्टिकल इन ब्युटी थेरपी - १०० मार्क

एकूण - ४०० गुण थेअरी - २०० गुण प्रात्यक्षिक - २०० गुण

अधिक माहितीसाठी संपर्क : प्रा. वर्षा साठे (समन्वयक)

२१) कौशल्याधिष्ठित स्वयंसहाय्यता अभ्यासक्रम

विद्यार्थिनींना रोजगार व स्वयंरोजगाराच्या संधी उपलब्ध करून देण्याच्या उद्देशाने महाविद्यालयात अल्प कालावधीचे पुढील विविध १७ कौशल्याधिष्ठित स्वयंसहाय्यता अभ्यासक्रमांचे आयोजन करण्यात येते.

कोर्सचे नाव	कालावधी/महिने	फी/रुपये
ब्युटी कल्चर ॲण्ड थेरपी	**१ वर्ष** **६ महिने** (जुलै ते डिसेंबर)	१,५००/- १,०००/-
नेल आर्ट	**१० दिवस** (प्रत्येक महिन्यात १ ते १० तारीख)	२००/-
मेहंदी डिझाईन	**६ दिवस** (प्रत्येक महिन्यात ११ ते १६ तारीख)	२००/-
हेअरकटींग	**५ दिवस** (प्रत्येक महिन्यात २० ते २५ तारीख)	३००/-
हेअर स्टाईल	**५ दिवस** (प्रत्येक महिन्यात २५ ते ३० तारीख)	३००/-
साडी ड्रेपिंग	**५ दिवस** (प्रत्येक महिन्यात १५ ते २० तारीख)	२००/-
बेसिक मेकअप	**२ दिवस** (प्रत्येक महिन्यात १ ते २ तारीख)	१००/-
पार्टी मेकअप	**५ दिवस** (प्रत्येक महिन्यात १ ते ५ तारीख)	२००/-
पर्सनल ग्रुमिंग	**५ दिवस** (प्रत्येक महिन्यात ११ ते १६ तारीख)	२००/-
स्कीन पॉलिशिंग	**५ दिवस** (प्रत्येक महिन्यात १ ते ५ तारीख)	३००/-
ब्युटी पार्लर मॅनेजमेंट	**१ महिना** (प्रत्येक महिन्याला)	५००/-
बेसिक ब्युटीशियन	**३ महिने** (प्रत्येक ३ महिन्याला)	१,५००/-
पेडिक्युअर	**५ दिवस** (प्रत्येक महिन्याला)	२००/-
मॅनिक्युअर	**५ दिवस** (प्रत्येक महिन्याला)	२००/-

डिप्लोमा कोर्सेस

कोर्सचे नाव	कालावधी/महिने	फी/रुपये
ब्युटी कल्चर ॲण्ड थेरपी	**१ वर्ष**	५,०००/-
हेअर स्टाईल आणि ट्रीटमेंट	**६ महिने** (ऑगस्ट ते जानेवारी)	२,५००/-
नेल आर्ट डिझाईन आणि ट्रीटमेंट	**३ महिने** (फेब्रुवारी) **१ महिना** (एप्रिल)	१,०००/- ३००/-
बॉडी पॉलिशिंग	**१ महिना** (मार्च व ऑक्टोंबर)	५००/-
पेडिक्युअर मॅनेक्युअर	**१ महिना** (ऑक्टोंबर, एप्रिल, जुलै)	२००/-

अधिक माहितीसाठी संपर्क : प्रा. अश्विनी कुंभार - ८८६२०६२६१०, प्रा. तृप्ती माने - ९८८१०१३९०१, संजना जाधव - -९०२१३५६००६

२२) अभ्यासक्रमाची लवचिकता (Academic Flexibility)

अभ्यासक्रमाची लवचिकता सुविधेअंतर्गत १२ वी कॉमर्स, १२ वी आर्टस् व १२ वी सायन्स उत्तीर्ण विद्यार्थिनी बी.सी.ए. भाग १ व बी. व्होक. भाग १ साठी प्रवेश घेऊ शकतात. तसेच कमला कॉलेज स्वायत्त पदवी अभ्यासक्रम शिकत असताना शिवाजी विद्यापीठ, दुरस्थ शिक्षण आणि यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठाच्या आर्टस्/कॉमर्स पदवी अभ्यासक्रमासाठी विद्यार्थिनी प्रवेश घेऊ शकतात व एकाचवेळी दोन शाखेच्या पदवी संपादन करू शकतात.

बॅचलर ऑफ कॉम्प्युटर ॲप्लीकेशन्स (बी. सी. ए.)

शासन मान्यतेनुसार शैक्षणिक वर्ष २००७-०८ पासून महाविद्यालयात बॅचलर ऑफ कॉम्प्युटर ॲप्लीकेशन्स (बी.सी.ए.) हा ३ वर्षाचा एकत्रित (3 Years Intergrated) अभ्यासक्रम सुरु करण्यात आला आहे. जागतिकीकरण आणि माहिती तंत्रज्ञानाच्या सध्याच्या युगात संगणकीय साक्षरता ही अत्यावश्यक बाब बनली आहे. सर्वच क्षेत्रातील नोकरी व व्यवसायांसाठी तसेच स्वयंरोजगारासाठी संगणकीय ज्ञान आणि कौशल्याची वाढती गरज नेमकेपणाने ओळखून महाविद्यालयात बी.सी.ए. हा अभ्यासक्रम शिकवण्याची सोय करण्यात आली आहे. या अभ्यासक्रमामुळे विद्यार्थिनींना सिस्टीम ॲनालिस्ट, सिस्टीम मॅनेजर, सॉफ्टवेअर इंजिनिअर, वेब डिझाईन प्रोग्रामर्स, डाटा ॲडमिनिस्ट्रेटर अशा विविध पदांवर रोजगाराच्या तसेच स्वयंरोजगाराच्या संधी उपलब्ध होऊ शकतील. विशेष उल्लेखनीय म्हणजे शैक्षणिक वर्ष २०२१-२२ मध्ये या विभागाच्या बी.सी.ए. भाग ३ च्या विद्यार्थींनी कु. सोनाली कांबळे, कु. प्रगती आवळे, कु. किरण पाटील, कु. प्रज्ञा माळी, कु. वैष्णवी चौगुले या विद्यार्थीनींची इन्फोसिस, पुणे येथे Process Execution या पदावर निवड झाली आहे.

सदर अभ्यासक्रमास कोणत्याही शाखेकडील १२ वी उत्तीर्ण किंवा १० वी नंतर किमान २ वर्षाची पदविका परीक्षा उत्तीर्ण विद्यार्थिनी प्रवेश घेऊ शकतात. शैक्षणिक वर्ष २०२४-२५ पासून बी. सी. ए. हा अभ्याक्रम AICTE मान्यताप्राप्त झाल्याने विद्यार्थ्यांची प्रवेश, फी, परीक्षा याबाबतचे AICTE सर्व नियम विद्यार्थींनींवर बंधनकारक राहतील. या अभ्यासक्रमासाठी प्रथम वर्षांसाठी विद्यार्थिनी संख्या मर्यादित राहील. विद्यापीठ नियमानुसार या अभ्यासक्रमास गुणवत्तेनुसार प्रवेश दिला जाईल. अध्यापनाचे माध्यम इंग्रजी राहील. विद्यापीठ अधिकार मंडळाच्या निर्णयानुसार शैक्षणिक वर्ष २०१०-११ पासून सर्व विद्या शाखेतील पदवी अभ्यासक्रमांना सत्रपद्धती (Semester Pattern) योजना लागू करण्यात आली आहे. सदरची सत्र पद्धती बी.सी.ए. या अभ्यासक्रमासाठीही लागू राहील. राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० प्रमाणे बी. सी. ए. अभ्यासक्रमासाठीचा श्रेयांक आराखडा आणि व विषय पुढीलप्रमाणेः

B. C. A. Structure

As per NEP-2020 Implemented from Academic Year 2023-24

Sem	DSC (Major)		DSE (Minor-I)	OE/GE	AEC (Language)	Value Added Courses	SEC	IKS	Summer Internship	Research Project / Dissertation	Total Credits
I	Computer-I (2) Computer-II (2) Practical-I (2) C Prog. I	C Prog. I Computer fundamentals & O. A.	Comm & Mgt.-I (2) [Acc. I] Comm & Mgt.-II (2) [PM I] Practical-I (2) [O.A]	Maths-I (2) Maths-II (2) Practical-I (2) [Tally]	English (2) B.C I			IKS (2) omp sci. in Ancient India]		-	22
	W-L/W=4+4=8		W-L/W=4+4=8	W-L/W=4+4=8	W-L/W=2						W-L/W=28
II	Computer-III (2) Computer-IV (2) Practical-I (2) C Prog. II	C Prog. II Web Designing	Comm & Mgt.-III (2) [Acc. II] Comm & Mgt. IV (2) [P M II] Practical0 (2) [Web Designing]	Stat-I (2) Stat-II (2) Practical-II (2) [Stat]	English (2) [B.C. II]		SEC-I (2) [Personality Development]			-	22
	W-L/W=4+4=8		W-L/W=4+4=8	W-L/W=4+4=8	W-L/W=2		W-L/W=2				W-L/W=32
Credits	8+4=12		8+4=12	6+6=12	04		02	02		-	44
Level 4.5 -Students exiting the programme after securing 49 credits will be awarded UG Certificate in the relevant Discipline /Subject (Computer)											
III	Computer-V (2) Computer-VI (2) Practical-II (4) [C++ Prog.]	C++ Prog. DBMS	Comm & Mgt.-V (2) [HRM] Practical-III (2) [DBMS]		English (2) [B. C III]	VAC- I (2) Democracy AEC- I (2) Environmental Science I	[Php I] SEC-II (2) SEC-III (2) [Php II]				22
	W-L/W=4+8=12		W-L/W=4+4=8				W-L/W=4				W-L/W=33
IV	Computer-VII (2) Computer-VIII (2) Practical-II (4) [DS]	RDBMS DS	Comm & Mgt.-VI (2) [ED] Practical-IV (2) [RDBMS]		English (2) [B. C. IV]	AEC-II (2) Environmental Science II	SEC-IV (2) [A.I. I] SEC-V (2) [A. I. II]	CC (2)			22

B. C. A. Structure (cont.)

As per NEP-2020 Implemented from Academic Year 2023-24

Sem	DSC (Major)		DSE (Minor-I)	OE/GE	AEC (Language)	Value Added Courses	SEC	IKS	Summer Internship	Research Project / Dissertation	Total Credits
	W-L/W=4+8=12		W-L/W=4+4=8		W-L/W=2	W-L/W=2					W-L/W=33
Credits	8+8=16		6 + 6 = 12		04	06	10	02		-	44
Level 5- Students exiting the programme after securing 99 credits will be awarded UG Diploma in the relevant Discipline /Subject (Computer)											
V	Computer-IX (2) Java Computer-X (2) C N Computer-XI (2) C#.net I Computer-XII (2) Cloud Comp. Practical-III (8) [java (2)]+[.net(2)]	Elective I (2) Python Or IOT	Comm & Mgt.-IX (2+0=2) M Commerce	-		-		-	FP (2)	-	22
	W-L/W=8+16=24		W-L/W=2			-					W-L/W=26
VI	Computer-XIII (2) Linux Computer-XIV (2) DWDM Computer-XV (2) C# .net II Computer-XVI (2) IT Security Practical-III (8) [Linux (2)]+[C#.net(2)]	Elective II (2) Android Programming Or R Programming	Comm & Mgt.-X (2+0=2) Digital Marketing	-		-	-	-	OJT (2)	-	22
	W-L/W=8+16=24		W-L/W=2			-					W-L/W=26
Credits	16+16=32	4	4+0=4								44
Level 5.5 Option 3 : Students who want to undertake 3 year UG programme will be awarded UG Degree in the relevant Discipline /Subject (Computer)upon securing 137 credits) or continue studies for Bachelor with Computer with (Honours/Research) Degree i.e to Level 8											
Total	60/60	4	24/24	12/9	8/8	6/6	10/9	2+2/4	4/4	-	132/ 132

B.C.A. Part-I (Semester : I)

(w.e.f. Academic Year 2024-25)

Course Code	Title of Paper	Credit	Internal	External	Total
DSC 101	Fundamentals of Computers with office Automations	2	10	40	50
DSC 102	Introduction to Programming Using 'C'	2	10	40	50
DSC 103	Principles of Management	2	10	40	50
ACE 104	Business Communication - I	2	10	40	50
DSC 105	Financial Accounting With Tally - I	2	10	40	50
DSC 106	Lab Course -I Based on DSC-102	2	-	50	50
DSC 107	Lab Course -I Based on DSC-101	2	-	50	50
GE 108	Lab Course -I Based on DSC-105	2	-	50	50
OE 109	Maths-I	2	10	40	50
OE 110	Maths-II	2	10	40	50
IKS 111	Indian Knowledge System (Computer Science in Ancient India)	2	50	-	50
		22	120	430	550

B.C.A. Part-I (Semester : II)

Course Code	Title of Paper	Credit	Internal	External	Total
DSC 201	Introduction to Programming Using C-II	2	10	40	50
DSC 202	Web Technologies	2	10	40	50
DSC 203	Financial Accounting With Tally-II	2	10	40	50
AEC 204	Business Communication - II	2	10	40	50
DSC 205	Principles of Management - II	2	10	40	50
DSC 206	Lab Course-I Based on DSC 201	2	-	50	50
DSC 207	Lab Course - II Based on DSC 202	2	-	50	50
GE 208	Lab Course - III Based on OE 209 & 210	2	-	50	50

Course Code	Title of Paper	Credit	Internal	External	Total
OE 209	Statistics - I	2	10	40	50
OE 210	Statistics - II	2	10	40	50
SEC-I 211	Personality Development	2	50	-	50
		22	120	430	550

B.C.A. Part-II (Semester : III)

Course Code	Title of Paper	Credit	Internal	External	Total
DSC 301	Object Oriented Programming Using C++	2	10	40	50
DSC 302	DBMS	2	10	40	50
DSC 303	Human Resource Management	2	10	40	50
AEC 304	Business Communication - III	2	10	40	50
VAC-I 305	Democracy	2	-	50	50
AEC-I 306	Environmental Science - I	2	10	40	50
DSC 307	Lab Course-I Based on DSC 301	2	-	100	100
DSC 308	Lab Course-I Based on DSC 302	2	-	50	50
SEC-II 309	PHP - I	2	-	50	50
SEC-III 310	PHP - II	2	-	50	50
		22	50	500	550

B.C.A. Part-II (Semester : IV)

Course Code	Title of Paper	Credit	Internal	External	Total
DSC 401	RDBMS	2	10	40	50
DSC 402	Data Structures	2	10	40	50
DSC 403	Entrepreneurship Development	2	10	40	50
AEC 404	Business Communication - IV	2	10	40	50
AEC-II 405	Environmental Science - II	2	10	40	50
DSC 406	Lab Course-I Based on DSC 401	4	-	100	100
DSE 407	Lab Course-I Based on DSC 402	2	-	50	50
CC 408	Comulsory Course	2	-	50	50

Course Code	Title of Paper	Credit	Internal	External	Total
SEC - IV 409	Artificial Intelligence - I	2	-	50	50
SEC - V 410	Artificial Intelligence - II	2	-	50	50
		22	50	500	550

B.C.A. Part-III (Semester : V)

(As per Autonomous College)

Course Code	Title of Paper	Credit	Internal	External	Total
DSC 501	Java Programming	2	10	40	50
DSC 502	Computer Network and INternet	2	10	40	50
DSC 503	ASP. NET using C# - I	2	10	40	50
DSC 504	Cloud Computing	2	10	40	50
DSC 505	Python/IOT	2	10	40	50
DSC 506	M-Commerce	2	10	40	50
INT 507	Field Project/Mini Project	2	-	50	50
DSC 508	Lab Course - I Based on DSC 501	4	-	100	100
DSC 509	Lab Course - I Based on DSC 503	4	-	100	100
		22	60	490	550

B.C.A. Part-III (Semester : VI)

(As per Autonomous College)

Course Code	Title of Paper	Credit	Internal	External	Total
DSC 601	Linux	2	10	40	50
DSC 602	Data Warehousing and Data Mining	2	10	40	50
DSC 603	ASP. Net using C# - II	2	10	40	50
AEC 604	IT - Security	2	10	40	50
AEC-II 605	Android Programming/R Programming	2	10	40	50
DSC 606	Digital Marketing	2	10	40	50

Course Code	Title of Paper	Credit	Internal	External	Total
DSC 607	Lab Course-I Based on DSC 601	4	-	100	100
DSC 608	Lab Course-I Based on DSC 603	4	-	100	100
DSC 609	OJT/Major Project	2	-	50	50
		22	60	490	550

*** वरील अभ्यासक्रमात वेळोवेळी होणारा बदल सर्व प्रवेश घेऊ इच्छिणाऱ्या व प्रवेश घेतलेल्या विद्यार्थिनींना बंधनकारक राहील.**

बॅचलर ऑफ व्होकेशन (बी.व्होक.)

शैक्षणिक वर्ष २०१४-१५ पासून महाविद्यालयात यूजीसी, नवी दिल्ली मान्यताप्राप्त आणि शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर संलग्नित बॅचलर ऑफ व्होकेशन इन - १) रिटेल मॅनेजमेंट अँड आय.टी. २) फूड प्रोसेसिंग अँड मॅनेजमेंट हे दोन कौशल्यावर आधारित (Skill Based) व्यावसायिक पदवी अभ्यासक्रम सुरु करण्यात आले आहेत. काळाशी सुसंगत आणि कौशल्य विकसित करणारे शिक्षण देणे ही २१ व्या शतकाची खरी गरज आहे. अर्थव्यवस्थेतील विविध उभरत्या क्षेत्रांना लागणारे मनुष्यबळ विकसित करण्यासाठी विद्यापीठ अनुदान आयोग, नवी दिल्ली यांनी १२ व्या योजनेअंतर्गत बॅचलर ऑफ व्होकेशन (बी. व्होक.) हा ३ वर्षाचा पदवी व्यावसायिक अभ्यासक्रम सुरु करण्याचा महत्वाकांक्षी प्रकल्प हाती घेतला आहे. त्याअंतर्गत आमच्या महाविद्यालयास रिटेल मॅनेजमेंट अँड आय.टी. व फूड प्रोसेसिंग अँड मॅनेजमेंट हे दोन अभ्यासक्रम सुरु करण्यास मान्यता मिळाली आहे. त्यासाठी यूजीसीकडून महाविद्यालयास १ कोटी ८५ लाख रु. चे अनुदान मंजूर झाले आहे. कोणत्याही शाखेच्या १२ वी उत्तीर्ण किंवा तत्सम समकक्ष परीक्षा उत्तीर्ण विद्यार्थिनी या अभ्यासक्रमास प्रवेश घेऊ शकतात. शिवाजी विद्यापीठ परिक्षेत्रात हे दोन अभ्यासक्रम शिकविण्याची सोय केवळ कमला महाविद्यालयात आणि प्रथमच उपलब्ध आहे. या प्रत्येक अभ्यासक्रमासाठी विद्यार्थिनी संख्या मर्यादा ५० राहील.

बी. व्होक. अभ्यासक्रमाचे खास वैशिष्ट्य म्हणजे विद्यार्थिनींनी या अभ्यासक्रमाचे केवळ प्रथम वर्ष पूर्ण केल्यास डिप्लोमा, केवळ प्रथम व द्वितीय वर्ष पूर्ण केल्यास ॲडव्हान्स्ड डिप्लोमा आणि तीनही वर्षे पूर्ण केल्यास बी. व्होक. ही पदवी मिळेल. हा अभ्यासक्रम पूर्ण केल्यास विद्यार्थिनींना रोजगार व स्वयंरोजगाराच्या संधी मोठ्या प्रमाणावर उपलब्ध होतील. **विशेष उल्लेखनीय म्हणजे या विभागाच्या ८५% हून अधिक विद्यार्थिनी रोजगार व स्वयंरोजगारात कार्यरत आहेत.** विद्यार्थिनींना या कोर्सचे प्रात्यक्षिक ज्ञान देण्यासाठी अद्ययावत प्रयोगशाळाही उभारण्यात आली आहे.

१) बी. व्होक. (फूड प्रोसेसिंग अँड मॅनेजमेंट) : अन्न ही मानवाची मुलभूत गरज आहे. आजच्या जागतिकीकरणाच्या व गतिमान युगात केवळ भूक भागविणे ही अन्नाची गरज न राहता नाशवंत अन्नपदार्थाची चव नेहमी चाखता येण्याकरिता तसेच शेतीमालावर अन्न प्रक्रिया करून नाविन्यपूर्ण, दीर्घकाळ टिकणारे, समृद्धीकरण केलेले, विशिष्ट परिस्थितीत व कार्यात वापरता येणारे अन्नपदार्थ उपलब्ध करता यावेत या दृष्टीने

अन्नप्रक्रिया उद्योग ही आजच्या काळाची गरज बनली आहे. 'Farm to Fork' असा हा अन्न प्रक्रिया उद्योग जगातील सर्वात जास्त गतीने म्हणजे २०% नी भरभराटीला येणारा उद्योग म्हणून ओळखला जातो. या क्षेत्रात विविध पदावर कुशल मनुष्यबळाची नितांत गरज आहे. असे मनुष्यबळ विकसित करण्याच्या दृष्टीने आवश्यक ज्ञान व कौशल्य देण्यासाठी महाविद्यालयात बी. व्होक. इन फूड प्रोसेसिंग ॲन्ड मॅनेजमेंट हा व्यावसायिक अभ्यासक्रम सुरु करण्यात आला आहे. या क्षेत्रात अन्नपदार्थाची निर्मिती, संरक्षण, गुणवत्ता नियंत्रण, संशोधन, प्रशासकीय सेवा, अशा विविध क्षेत्रात आज रोजगाराच्या असंख्य संधी उपलब्ध आहेत. तसेच या क्षेत्रात स्वयंरोजगार/ उद्योग सुरु करण्यास भरपूर वाव आहे.

बी. व्होक. फूड प्रोसेसिंग अँड मॅनेजमेंट

B. Voc. Part-I (Diploma) Semester - I & II

Sr. No.	Semester I		Sr. No.	Semester II	
	Course code	Title of Course		Course code	Title of Course
1.	A1 - ASCC	Business Communication I	1.	B1 - ASCC	Business Communication I I
2.	A2 - ASCC	Fundamentals of Food Science – I	2.	B2 - ASCC	Fundamentals of Food Science – II
3.	A3 - DSC	Principles Food Preservation- I	3.	B3 - DSC	Principles Food Preservation- II
4.	A4 - DSC	Fundamentals of Agro Processing – I	4.	B4 - DSC	Fundamentals of Agro Processing – II
5.	A5 - DSC	Bakery & Confectionary – I	5.	B5 - DSC	Bakery & Confectionary – II
6.	A6 - SDC	Laboratory Work : Principles Food Preservation - I	6.	B6 - SDC	Laboratory Work : Principles Food Preservation - II
7.	A7 – SDC	Laboratory Work: Fundamentals of Agro Processing - I	7.	B7 – SDC	Laboratory Work: Fundamentals of Agro Processing - II
8.	A8 – SDC	Laboratory Work : Bakery & Confectionary -I	8.	B8 – SDC	Laboratory Work : Bakery & Confectionary -II
9.	A9 - IP	Project	9.	B9 - IP	Project

B. Voc. Part-II (Advanced Diploma) Semester - III & IV

Sr. No.	Semester III		Sr. No.	Semester IV	
	Course code	Title of Course		Course code	Title of Course
1.	C1- ASCC	Fundamentals of Financial Accounting – I	1.	D1- ASCC	Fundamentals of Financial Accounting – II
2.	C2 - ASCC	Food Nutrition I	2.	D2 - ASCC	Food Nutrition II
3.	C3- DSC	Fruits and Vegetable Processing- I	3.	D3- DSC	Fruits and Vegetable Processing- II
4.	C4- DSC	Milk and Milk Product Processing- I	4.	D4- DSC	Milk and Milk Product Processing- II
5.	C5 - DSC	Food Quality control-I	5.	D5 - DSC	Food Quality control - II
6.	C6- SDC	Laboratory Work : Fruits and Vegetable Processing- I	6.	D6- SDC	Laboratory Work : Fruits and Vegetable Processing- II
7.	C7– SDC	Laboratory Work: Milk and Milk Product Processing- I	7.	D7– SDC	Laboratory Work: Milk and Milk Product Processing- II
8.	C8 – SDC	Laboratory Work : Food Quality control I	8.	D8 – SDC	Laboratory Work : Food Quality control II
9.	C9- IP	Project	9.	D9- IP	Project

B. Voc. Part-III (Degree) Semester - V & VI

Sr. No.	Semester V		Sr. No.	Semester VI	
	Course code	Title of Course		Course code	Title of Course
1.	E1- ASCC	Research Methodology	1.	F1- ASCC	Business Management
2.	E2 - ASCC	Legal Aspects of Food Industry	2.	F2 - ASCC	Food Hygiene and Sanitation
3.	E3- DSC	Meat, Fish and Poultry Processing	3.	F3- DSC	Snack Food Processing
4.	E4- DSC	Food Chemistry	4.	F4- DSC	Food Microbiology
5.	E5 - DSC	Beverage Processing	5.	F5 - DSC	Food Packaging
6.	E6- SDC	Laboratory Work : Meat, Fish and Poultry Processing	6.	F6- SDC	Laboratory Work : - Snack Food Processing
7.	E7– SDC	Laboratory Work : Food Chemistry	7.	F7– SDC	Laboratory Work : Food Microbiology
8.	E8 – SDC	Laboratory Work : Beverage Processing	8.	F8 – SDC	Laboratory Work : Food Packaging
9.	E9- IP	Internship	9.	F9- IP	Project

* वरील अभ्यासक्रमात वेळोवेळी होणारा बदल सर्व प्रवेश घेऊ इच्छिणाऱ्या व प्रवेश घेतलेल्या विद्यार्थिनींना बंधनकारक राहील.

२) बी. व्होक. (रिटेल मॅनेजमेंट अँड आय.टी.)

रिटेलिंग हा आपल्या दैनंदिन जीवनाचा अविभाज्य भाग बनला आहे. जागतिकीकरणामुळे व माहिती तंत्रज्ञानामुळे रिटेलिंग क्षेत्रात रोजगाराच्या संधी मोठ्या प्रमाणावर निर्माण झाल्या आहेत. नवनवीन तंत्रज्ञान, राहणीमानाच्या बदलत्या संकल्पना, माध्यमांचा प्रसार, विभक्त कुटुंब पद्धती यामुळे सध्या मॉल संस्कृतीचा विस्तार झपाट्याने होत आहे. या विविध मॉल्समध्ये स्टोअर मॅनेजर, डिपार्टमेंटल मॅनेजर, कस्टमर केअर असोसिएट, सप्लाय चेन मॅनेजर, एच. आर. मॅनेजर अशा विविध पदांवर काम करण्यासाठी कुशल व प्रशिक्षित मनुष्यबळाची गरज आहे. ह्या विविध पदांच्या जबाबदाऱ्या पार पाडण्यासाठी आवश्यक ज्ञान व कौशल्य विद्यार्थिनींना देण्यासाठी, त्यांच्यात नाविन्यपूर्ण आणि व्यावसायिक दृष्टीकोन रुजविण्यासाठी महाविद्यालयात बी. व्होक. इन रिटेल मॅनेजमेंट अँड आय. टी. हा अभ्यासक्रम सुरु करण्यात आला आहे.

शैक्षणिक वर्ष २०२४-२५ पासून बी. व्होक. (रिटेल मॅनेजमेंट प्रथम वर्ष) हा अभ्यासक्रम बंद करण्यात आला आहे. बी. व्होक. रिटेल मॅनेजमेंट तृतीय वर्ष **(Semester - V & VI)** चा अभ्यासक्रम पुढीलप्रमाणे.

बी. व्होक. (रिटेल मॅनेजमेंट अँड आय. टी.)

B. Voc. Part-III (Degree) Semester - V

Sr. No.	Paper No.	Title
